**ठळक बातम्या**

- वंचितांचं आरक्षण टिकवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून नंदुरबारमधल्या सभेत पुनरुच्चार
- हरियाणातल्या भाजपा सरकारनं बहुमत गमावल्यानं राष्ट्रपती राजवट लागू करण्याची काँग्रेसची मागणी
- नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी दोघांना जन्मठेप, पुराव्याअभावी तिघांची निर्दोष मुक्तता

**आणि**

- अक्षय तृतीयेच्या सणाचा देशभरात उत्साह, उत्तराखंडमधली चारधाम यात्रा आजपासून सुरू

**<><><><><>**

वंचित वर्गाच्या आरक्षणाच्या रक्षणासाठी सदैव कार्यरत राहणार आहे. ST, SC आणि ओबीसींच आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नंदुरबारमधल्या प्रचारसभेत केला. महाविकास आघाडी SC, ST आणि OBC चे आरक्षण हटवण्यासाठी कार्यरत आहे. आरक्षण वाचवण्याचं आश्वासन आपण गेले कित्येक दिवस देत असून काँग्रेस या मुद्द्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचा दावा त्यांनी केला.

आदिवासींच्या विरोधामुळं काँग्रेसनं राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांना विरोध केल्याचं ते म्हणाले. राम मंदिराच्या मुद्द्यांवरुन काँग्रेसनं घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी टीका केली. शरद पवार यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत निकालानंतर उद्धव ठाकरे

आणि शरद पवार यांना त्यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्यावाचून पर्याय उरणार नसल्याचं ते म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी प्रधानमंत्र्यांच्या संदर्भात वापरलेल्या आक्षेपार्ह शब्दांचा त्यांनी समाचार घेतला. देशातल्या सर्व माता-भगिनी माझ्या संरक्षक असल्याचं त्यांनी सांगितलं. सीकल सेल ॲनिमिया निर्मुलनसह नंदुरबारमधल्या विकासकामांचा दाखला त्यांनी यावेळी दिला.

**होल्ड - प्रधानमंत्री..(२५ सेकंद)**

**<><><><><>**

महागाई कमी करण्याचं आपलं वचन पाळण्यात भाजपा सरकार अपयशी ठरल्याची टीका आम आदमी पक्षानं केली आहे. आपचे नेते सौरभ भारद्वाज यांनी पत्रकारांशी बोलताना भाजपवर टीकास्त्र सोडलं. भाजपा सरकारच्या काळात भूक निर्देशांकात भयंकर घसरण झाली आहे. ज्या प्रमाणात खर्च वाढला आहे त्या प्रमाणात लोकांचं उत्पन्न वाढलं नाही. प्रचंड बेरोजगारी आणि गगनाला भिडणाऱ्या महागाईमुळेच ८५ कोटी लोकांना रेशन वाटप करावं लागत आहे, असा आरोपही भारद्वाज यांनी केला. डाळ, भाजीपाला आणि स्वयंपाकासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या वाढत्या किमतीकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या बैतुल लोकसभा मतदार संघाच्या काही मतदान केंद्रांवर आज फेरमतदान सुरु आहे. ७ मे रोजी या मतदारसंघातील मतदान यंत्र घेऊन जाणाऱ्या बसला लागलेल्या आगीत ही मतदानयंत्रे नष्ट झाल्यामुळे इथे आज फेरमतदान होत आहे. बैतुल लोकसभा मतदार संघातल्या राजापूर, दुदार रयत, कुंदा रयत आणि

चिखलीमाल या मतदान केंद्रांवर शांततेत मतदान सुरु असल्याची माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

<><><><><>

हरियाणात भाजपाच्या राज्य सरकारनं बहुमत गमावलं असून इथं राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे. नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत आज ते बोलत होते. तीन अपक्ष आमदारांनी भाजपप्रणीत राज्य सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. त्यामुळे सरकारनं बहुमत गमावलं असून इथं राष्ट्रपती राजवाट लागू करणं योग्य आहे, असं जयराम रमेश म्हणाले. भाजपाचे हरियाणा आणि केंद्रातले दिवस भरत आल्याची टीकाही त्यांनी केली.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘भिवंडी आणि कल्याण’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

अंधश्रद्धा निर्मुलन क्षेत्रात कार्यरत ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी त्यांच्यावर गोळीबार करणाऱ्या सचिन अंदुरें आणि शरद कळसकर यांना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या दोघांनी गोळी झाडल्याची कबुली दिली होती. तर पुराव्या अभावी डॉ.

विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची मुक्तता केली आहे. याप्रकरणात UAPA अंतर्गत लावलेले आरोपही न्यायालयानं फेटाळले.

दोषी असलेल्या दोघांना शिक्षा देण्याच्या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचं दाभोलकर यांची कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात सकाळी दाभोळकर यांची हत्या झाली होती.

**<><><><><>**

नांदेडमधल्या खासगी वित्त कंपन्यांच्या कार्यालयावर आयकर विभागाने आज छापेमारी केली. कोकाटे कॉम्प्लेक्स, अलिभाई टॉवर इथल्या कंपन्यांच्या कार्यालयांवर ही कारवाई केली गेली. आयकर विभागाचे कर्मचारी सकाळी सात वाजल्यापासून शहरातल्या शिवाजी नगरामधल्या पाच ते सात ठिकाणी तपास करत असल्याचं सांगितलं गेलं आहे. नाशिक आयकर विभागातील जवळपास शंभर अधिकारी या कारवाईत सहभागी झाले होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सर्व देशवासीयांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या. या शुभ दिवसाच्या निमित्तानं लोकांना दानधर्म करण्याची प्रेरणा मिळेल. तसंच सर्वांच्या आयुष्यात नवी ऊर्जा आणि उत्साह निर्माण होईल, अशी कामना मोदी यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अक्षय तृतीयेच्या मुहुर्तावर उत्तराखंडच्या केदारनाथ मंदिराचे दरवाजे आज मंत्रोच्चाराच्या गजरात भाविकांसाठी खुले करण्यात आले. या मुहुर्तावरच आजपासून चारधाम यात्रेचाही शुभारंभ झाला आहे. आज सकाळी केदारनाथ मंदिरात झालेल्या सोहळ्याला मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांच्यासह मोठया संख्येनं भाविक उपस्थित होते. गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजेही आजच उघडण्यात आले आहेत. चारधाम यात्रेसाठी राज्य सरकारनं चोख व्यवस्था केली असून या यात्रेसाठी आतापर्यंत २२ लाख लोकांनी नोंदणी केली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी राजकीय पक्ष आकाशवाणीवरुनही संदेश प्रसारित करीत आहेत. आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दुपारी ३ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज या राजकीय प्रसारणानंतर म्हणजे दुपारी ३ वाजून ४० मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

एअर इंडिया एक्स्प्रेसचं व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांमध्ये समझौता झाला तरीही आज केरळमधल्या चारही आंतरराष्ट्रीय विमानतळांवरुन आखाती देशासाठी एकही विमान उडू शकलं नाही. कोचिन विमानतळावरुन आज सकाळची दम्मन आणि मस्कतला जाणारी विमानं रद्द करण्यात आली तर कन्नूर आणि तिरुअवनंतपुरम विमानतळावरुनही शारजाह, मस्कत, दुबई आदी शहरांना जाणारी विमान रद्द करण्यात आली.

**<><><><><>**

शिवकाशीच्या फटाका कारखान्यात काल झालेल्या फटाक्यांच्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आता दहा झाली आहे. या स्फोटात ११ जण गंभीर जखमी झाले आहेत.  स्फोटानंतर ढिगारा हटवण्याचं काम सुरु होऊन त्यामधून बेपत्ता लोकांचाही शोध सुरु आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. स्टॅलिन यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. कारखान्याचा मालक तसचं आणखी एका व्यक्तीवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**<><><><><>**

भारत आणि ब्रिटन यांच्यात काल नवी दिल्लीत धोरणात्मक चर्चा झाली. भारताचे प्रतिनिधित्व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी ब्रिटनचे प्रतिनिधित्व ब्रिटनचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार टिम बॅरो यांनी केलं. या बैठकीत दोन्ही प्रतिनिधींनी सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यावर आणि जागतिक सुरक्षा आव्हानं यावर चर्चा केली. या बैठकीत तंत्रज्ञान आणि सुरक्षा उपक्रमांवर भर देण्यात आल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. दोन्ही देशांनी प्रादेशिक मुद्द्यांवर आणि परस्पर हिताच्या जागतिक बाबींवरही चर्चा केल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरूने किंग्ज एलेव्हन पंजाबवर साठ धावांनी मात केली. २४२ धावांचा पाठलाग करताना पंजाबचा डाव १८१ धावांवर गुंडाळला गेला.

रायली रॅास्को यानं पंजाबकडून सर्वाधिक ६१ धावा केल्या. आरसीबीकडून मोहम्मद सिराजनं तीन तर स्वप्निल सिंग, कर्ण शर्मा आणि लॅाकी फर्ग्युसन यांनी प्रत्येक दोन बळी घेतले. पंजाबनं नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता.

पहिल्या डावात आरसीबीकडून विराट कोहलीने सर्वाधिक ९२ तर रजत पाटीदारने ५५ धावा केल्या. तर पंजाबकडून हर्षल पटेलने तीन बळी टिपले.

**//<><><><><>//**